# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# सोमवार दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६

## ठळक बातम्या

1. **संसदेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरूवात.**
2. **यंदाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी रेल्वे प्रकल्पांकरिता सुमारे 24 हजार कोटी रुपयांची तरतूद- केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती.**
3. **नागपुरात प्रथमच 'ॲडव्हांटेज विदर्भ 2026 – खासदार औद्योगिक महोत्सव' अंतर्गत 23 हून अधिक देशांचे राजदूत,व्यापार प्रतिनिधी सहभागी होणार.**
4. **नागपूर महानगरपालिकेत भाजप आणि काँग्रेस तर्फे महापौर आणि उपमहापौर पदासाठी नामांकन दाखल; 6 फेब्रुवारीला होणार निवडणूक.**

## आता सविस्तर बातम्या .......

धन्यवाद प्रस्ताव

लोकसभेत आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरूवात झाली. राष्ट्रपतींचा संदेश अतिशय महत्त्वपूर्ण होता असं म्हणत केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी धन्यवाद प्रस्ताव मांडला. देशाच्या भविष्याविषयी अतिशय प्रभावी दृष्टीकोन राष्ट्रपतींनी या भाषणात व्यक्त केला. सामाजिक न्याय, सर्वसमावेशक विकास आणि विकसित भारताचं सरकारचं उद्दिष्ट यात प्रतिबिंबित होत असल्याचं सोनोवाल म्हणाले. त्यानंतर खासदार तेजस्वी सूर्या यांनी यावर भाषण केलं. गेल्या १२ वर्षात केंद्र सरकारवर एकही भ्रष्टाचाराचा आरोप झाला नसल्याचं ते यावेळी म्हणाले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी यावर बोलायला सुरुवात केल्यावर सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी त्यांच्या काही मुद्द्यांवर

आक्षेप घेतला. त्यानंतर झालेल्या गदारोळामुळं लोकसभेचं कामकाज ३ वाजेपर्यंत तहकूब झालं. राज्यसभेत सी सदानंदन मास्टर यांनी धन्यवाद प्रस्ताव मांडला. लोकसभेत यावर १८ तास चर्चा होईल आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बुधवारी या चर्चेला उत्तर देतील, अशी माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रीजिजू यांनी दिली. राज्यसभेत यावर १६ तास चर्चा होईल. त्यानंतर केंद्रीय अर्थसंकल्पावरची चर्चा सुरू होईल.

रेल्वे पायाभूत सुविधां

महाराष्ट्राच्या रेल्वे पायाभूत सुविधांना चालना देणाऱ्या अर्थसंकल्पीय तरतुदींची माहिती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दिली. नवी दिल्ली येथील रेल्वे भवनातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले की, चालू अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी रेल्वे प्रकल्पांकरिता सुमारे 24 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पुणे ते हैदराबाद हे अंतर 1 तास 55 मिनिटांत पूर्ण करणे शक्य होणार आहे. रेल्वे ही मध्यमवर्गीय व अल्प उत्पन्न गटाची जीवनवाहिनी असल्याने बुलेट ट्रेनचे भाडे किफायतशीर ठेवण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. मुंबई उपनगरीय रेल्वेसाठी 16 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, ऑटोमॅटिक दरवाजे व ऑक्सिजन सुविधेसह मेट्रो कोचसारख्या 238 नवीन लोकल गाड्या सुरू केल्या जाणार आहेत. यामुळे प्रवाशांना अधिक सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळेल, असे वैष्णव यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेत नागपूर येथील दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता हेही व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

माय भारत बजेट क्वेस्ट

केंद्र सरकार 'माय भारत बजेट क्वेस्ट', हा उपक्रम सुरू करणार असल्याची घोषणा युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी आज नवी दिल्लीत केली. ‘माय भारत’ प्लॅटफॉर्मवर उद्यापासून ही स्पर्धा सुरु होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. येत्या १७ फेब्रुवारी पर्यंत या स्पर्धेसाठी नोंदणी करता

येईल. पहिल्या फेरीत ३० प्रश्नांची ऑनलाईन प्रश्नमंजुषा असेल. या फेरीत प्रत्येक राज्यातल्या सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांची निवड होईल, त्यानंतर निबंध लेखन फेरी असेल.  या फेरीत युवकांना यंदाच्या अर्थसंकल्पावर आधारित ८ विषय दिले जातील. निबंध लेखन फेरीत निवड झालेल्या युवकांना येत्या मार्च महिन्यात 'विकसित भारत' अर्थसंकल्पाच्या दृष्टिकोनावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधण्यासाठी निमंत्रित केलं जाईल अशी माहिती त्यांनी दिली.

वीरभद्रन रामनाथ

भारतीय वंशाचे हवामान शास्त्रज्ञ वीरभद्रन रामनाथ यांना रॉयल स्वीडीश अकादमी ऑफ सायन्सेसनं २०२६ या वर्षाचा भूविज्ञानासाठीचा क्रॉफर्ड पुरस्कार जाहीर केला आहे. भूविज्ञानाच्या क्षेत्रातला नोबेल म्हणून हा पुरस्कार ओळखला जातो. सुमारे ९ लाख डॉलर आणि सुवर्णपदक असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. ८२ वर्षांचे असलेले रामनाथन कॅलिफोर्निया विद्यापीठात प्रतिष्ठीत प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.  कार्बन डाय ऑक्साइडच्या तुलनेत १० हजार पट अधिक कार्यक्षमतेने क्लोरोफ्लुरो कार्बन वातावरणात उष्णता साठवून ठेवतात असा शोध त्यांनी नासामध्ये कार्यरत असताना १९७५ मध्ये लावला होता. तोपर्यंत जागतिक तापमान वाढीला कार्बन डाय ऑक्साइड जबाबदार असल्याचा समज होता. मदुराईमध्ये जन्मलेले आणि चेन्नईत मोठे झालेल्या रामनाथन यांनी सिकंदराबादमध्ये फ्रीजच्या कारखान्यात पहिली नोकरी केली होती.

कोया कृषी कुंभ

कृषी विभाग आणि  'आत्मा' यांच्या संयुक्त विद्यमाने गडचिरोली येथे ५ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत कोया कृषी कुंभ महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी अविशांत पंडा यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. ५ फेब्रुवारीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते या कृषी कुंभ महोत्सवाचे उद्घाटन होईल. सहपालकमंत्री आशिष जयस्वाल हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील. मशरुम, शिंगाडा, स्ट्राबेरी, शिवाय शेतीशी निगडित बांबू उत्पादन, मधमाशी, मत्स्यपालन इत्यादी विषयांसंदर्भात प्रात्यक्षित सादर करण्यात येतील. पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात

तृणधान्यावर विशेष फोकस करण्यात येणार असून, बचत गटांना बाजारपेठेशी जोडण्याचा प्रयत्न केला जाईल.

‘ॲडव्हांटेज विदर्भ 2026

नागपुरात प्रथमच ‘ॲडव्हांटेज विदर्भ 2026 - खासदार औद्योगिक महोत्सव’ अंतर्गत 23 हून अधिक देशांचे राजदूत व व्यापार प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा तीन दिवसीय मेगा इंडस्ट्रियल एक्स्पो 6 ते 8 फेब्रुवारी 2026 रोजी नागपूर विद्यापीठ परिसरात होणार आहे. 7 फेब्रुवारी रोजी इंटरनॅशनल बिझनेस कॉन्क्लेव्हचे आयोजन असून द्विपक्षीय व्यापार व गुंतवणूक संधींवर चर्चा होईल. रशिया, चीन, ब्राझील, आफ्रिका व लॅटिन अमेरिका यांसह अनेक देशांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.  या परिषदेच्या माध्यमातून विदर्भातील उद्योजकांना थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडले जाण्याची संधी मिळणार आहे. हा महोत्सव विदर्भाला उदयोन्मुख औद्योगिक केंद्र म्हणून जागतिक स्तरावर ओळख मिळवून देणार आहे.

नागपूर महापौर

नागपूरमध्ये आज भाजपाच्या नीता ठाकरे यांनी महापौर पदासाठी तर लीला हाथीबेड यांनी उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र सादर केलं. काँग्रेसकडून महापौर पदासाठी स्नेहल ठाकरे तर उपमहापौर पदासाठी विवेक निकोसे यांनी अर्ज दाखल केले आहेत.भाजपाच्या नीता ठाकरे  यांनी नामनिर्देशन पत्र दाखल केल्यावर मीडिया सोबत संवाद साधला..

नागपूरचं महापौर पद सर्वसाधारण महिला गटासाठी राखीव आहे. नागपूरमध्ये शुक्रवारी महापौर, उपमहापौरपदाची निवडणूक होणार आहे. अमरावतीमध्ये भाजपनं श्रीचंद तेजवानी यांना महापौरपदाची उमेदवारी जाहीर केली आहे.

## ग्रॅमी पुरस्कार

धर्मगुरू दलाई लामा आणि के पॉप डेमॉन हंटर्सला यंदा पहिल्यांदाचा ग्रॅमी पुरस्कार मिळाला आहे. श्राव्य पुस्तकं, कथाकथन या श्रेणीत Meditations: The Reflections Of His Holiness The Dalai Lama या पुस्तकासाठी दलाई लामा यांना हा पुरस्कार मिळाला. हे व्यक्तीगत यश नसून सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याची प्रतिक्रिया दलाई लामा यांनी दिली आहे. दृकश्राव्य श्रेणीत के पॉप यांच्या गोल्डन या गाण्याला हा पुरस्कार मिळाला. Music for John Williams या अल्बमसाठी दिग्दर्शक स्टीव्हन स्पीलबर्ग यांना पहिलाच ग्रॅमी पुरस्कार मिळाला आहे.

## ‘अविष्कार 2025’

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ संशोधन संमेलन ‘अविष्कार 2025’ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत एकूण 7 पारितोषिके पटकावली आहेत. ही स्पर्धा वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे 28 ते 31 जानेवारी 2026 दरम्यान पार पडली. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी वाणिज्य, शुद्ध विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय व फार्मसी अशा चार प्रवर्गांत यश मिळवले. यामध्ये फेलोशिप, प्रोत्साहनपर व रोख पारितोषिकांचा समावेश आहे. राज्यस्तरावर महाराष्ट्रातील 26 विद्यापीठांतील 901 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## वाघ जेरबंद

गोंदिया जिल्ह्याच्या सडक अर्जुनी तालुक्यातल्या सौंदड भवतालच्या परिसरात धुमाकूळ घातलेल्या एका नरभक्षक वाघाला जेरबंद करण्यात वनविभागाच्या चमूला आज यश आलं. या वाघानं दोन दिवसांपूर्वी माहुली इथल्या शेतात काम करत असलेल्या एका वृद्ध महिलेवर हल्ला करून तिला ठार केलं होतं. त्या व्यतिरिक्त या वाघानं एका युवकावर हल्ला करून त्यालाही जखमी केलं होतं.

खजूर लागवड

पारंपरिक शेतपिकांऐवजी शाश्वत आणि अधिक उत्पन्न देणाऱ्या पर्यायी पिकांकडे वळण्याच्या प्रक्रियेतला एक वेगळा प्रयत्न म्हणून अकोला जिल्ह्याच्या बाळापूर तालुक्यातल्या देगाव इथल्या शेतकऱ्यांनी खजूर लागवड केली आहे. देगाव परिसर लिंबू पिकासाठी प्रसिद्ध असूनही एक वेगळा मार्ग अनुसरत या शेतकऱ्यांनी आदर्श निर्माण केला आहे.

*****